
# ट्रम्प यांच्या विजयाचा अन्वयार्थ

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

वाजत-गाजत असलेली अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक अखेर पार पडली. तशी प्रत्येक निवडणूकच वैशिष्ट्यपूर्ण असते पण आजवरच्या अध्यक्षीय निवडणुकांची संदर्भ-चौकट पारंपरिक संकेतांनुसार नियत असे. निवडणूक त्या चौकटीत होत असे. उदा. रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक या दोनही प्रमुख पक्षांचे उमेदवार रुढ राजकारणातून वर आलेले असत, किमान अभ्यासू असत, त्यांना सभ्यतेची जाणीव असे, त्यांचे सार्वजनिक वाद वैयक्तिक मुद्द्यांपेक्षा धोरणांसंबंधी असत, इत्यादी. या निवडणुकीने ती चौकट मोडीत काढली.




त्याबरोबरच दोन्ही उमेदवारांची विश्वासार्हता सुरुवातीपासूनच इतकी रसातळाला असलेली प्रथमच पहायला मिळाली. ६० टक्केहून अधिक अमेरिकनांचा न क्लिंटनबाईंच्या प्रामाणिकपणावर विश्वास न ट्रम्प यांच्या. आजवर प्रचारादरम्यान एक उमेदवार प्रतिस्पर्ध्यापेक्षा आपण अध्यक्ष व्हायला अधिक योग्य आहोत हे मतदारांना पटवत असे. तरी एकूण जनमत दोन्ही उमेदवार त्या पदासाठी कमीअधिक लायक आहेत हे असे. दोघेही अयोग्य हे जनमत आताच बघायला मिळाले. त्यात 'मी हरलो तर निवडणूक प्रक्रियाच भ्रष्ट आहे', असा दावाही ट्रम्प यांनी केला! या प्रक्रियेच्या पारदर्शी सचोटीविषयी तरी लोकांना आजपर्यंत शंका नसे. ती आली. यामुळे अमेरिकेची जागतिक प्रतिमा, लोकशाही शिकवण्याचा अहंकार यांना तडा गेला. वैयक्तिक करिश्मा, पैसा, तत्कालीन एखादी सामाजिक लाट यांचा प्रभाव भारतीय निवडणुकांसारखाच अमेरिकन निवडणुकातही असतो. पण अमेरिकेचे जगातील प्रभुत्व लोकशाहीच्या घोषाखाली कायम राखणे याबाबत दोन्ही उमेदवारांचे गृहीत एकमत असे.

या परंपरेला ट्रम्प यांनी धक्का दिला. जगात अमेरिका ओबामा राजवटीने दुबळी केली आहे, विविध देशांच्या संघटनांशी (युरप, उ. अमेरिका खंड इत्यादी) तह केल्याने अमेरिकेचे नुकसान होत आहे, रशियाचा पुतीन ओबामापेक्षा समर्थ नेता आहे, बाहेरच्यांना शिकवण्यापेक्षा आपल्या देशात काय चालले आहे, ते बघा आणि सुधारा असा पवित्रा घेतला. (तो मुद्दा ग्राह्यही आहे पण त्यावरचे ट्रम्प यांचे उपाय संशयास्पद आहेत, ते पुढे दिसेल.)

क्लिंटन या परिस्थितीच्या निर्मात्यांपैकी एक असल्याने, त्यांना आपण नक्की काय पर्याय देतो आहोत हे नीट पटवता आले नाही. तसेच सत्तेसाठी बाई काहीही म्हणतील असा लोकांचा ग्रह कायम राहिला.

डोनाल्ड ट्रम्प रिपब्लिकन पक्षातील इतर सोळा उमेदवारांचा पराभव करून पक्षाचे अधिकृत उमेदवार झाले. तेव्हापासून बेफाम, बेताल, बेजबाबदार वक्तव्ये करणे, समाजातील वर्ग-वर्ण संघर्षांना खतपाणी घालणे, प्रतिस्पर्धी उमेदवाराला भ्रष्ट, गुन्हेगार, खोटारडी म्हणणे व अध्यक्ष झाल्यास त्यांना तुरुंगाची हवा दाखवतो अशी उघड धमकी देणे - रोज नवे आक्रस्ताळे विधान ही त्यांच्या प्रचाराची शैली राहिली. त्यामुळे मीडियाला त्यांची दाखल सतत घ्यावी लागली. पण या सगळ्या 'प्रसंगी करमणूक करणाऱ्या' प्रचाराचा मुख्य मुद्दा प्रस्थापित व्यवस्था किडलेली आहे, ती उलथली पाहिजे हा राहिला आणि तो लोकांपर्यंत पोचला. ही व्यवस्था जागतिकीकरणाने दृढ होत आहे; अमेरिकेचे एकेकाळचे जागातिक वर्चस्व कमी झाले आहे आणि होत आहे; चीन व्यापारी कुरघोडी करत आहे; अमेरिकन नोकऱ्या इतर देशात जात आहेत आणि मेक्सिकन कामगार अनधिकृतरीत्या मोठ्या संख्येने अमेरिकेत येऊन इथल्या नोकऱ्या बळकावत आहेत; बहुतेक मेक्सिकन अमली पदार्थांचे व्यापारी, बलात्कार करणारे आणि गुन्हेगार आहेत; त्यांना मायदेशी सक्तीने रवाना करायला पाहिजे; ते येऊ नयेत म्हणून मेक्सिको - अमेरिकेच्या सीमेवर तटबंदी बांधली पाहिजे आणि त्याचा संपूर्ण खर्च मेक्सिकोने केला पाहिजे; मुस्लीम आतंकवाद जगात उच्छाद माजवत आहे म्हणून मुस्लिमांना अमेरिकेत यायलाच बंदी केली पाहिजे; आहेत त्यांच्यातील संभाव्य उपद्रवी लोकांवर त्यांच्याच समाजाने कडी

नजर ठेवली पाहिजे व पोलिसांना वेळोवेळी कळवले पाहिजे, ही काही मासलेवाईक उदाहरणे. तर, जागतिक पातळीवर - युरपला स्वस्तात अमेरिकन लष्करी संरक्षण देणे चूक आहे - त्या देशांनी त्यांच्या स्वत:च्या संरक्षणाचा भार उचलावा; NATO ही रशिया-अमेरिका शीत-युद्धामुळे चालू राहिलेली संघटना आता कालबाह्य आहे; पुतीनचे युक्रेन-क्रायमिया हस्तक्षेप आक्षेपार्ह नाहीत; वगैरे. वस्तुत: रशियाच्या वाढत्या साम्राज्यवादाने NATO अधिक समर्थ व्हायला पाहिजे हे युरपचे मत आहे. ट्रम्प यांच्या या विधानाने युरपमध्ये मोठीच खळबळ माजली. तीच गोष्ट जपान, द कोरियाच्या अमेरिकन सरंक्षणछत्राची. हा खर्च अमेरिकेवर अन्याय्य, अनावश्यक बोजा आहे; ही परिस्थिती निर्माण करणाच्या पापात क्लिंटनबाईंचा मोठा हातभार आहे; (त्या पहिल्या ओबामा कारकीर्दीत परराष्ट्रमंत्री होत्या. त्याआधी बिल क्लिंटन अरीझोनाचे गवर्नर , मग अमेरिकेचे अध्यक्ष असल्यापासून त्या सत्तेच्या उच्च वर्तुळात ३० वर्षे होत्या.) अशी इतर विधाने.

परिणामत: या प्रचारामुळे अमेरिकेत गोऱ्यांचा वर्चस्ववादाला खतपाणी मिळाले आहे. प्रसंगी तो हिंसकही होऊ लागला आहे. मेक्सिकन व मुस्लीमविरोधी वातावरणही तापले. शाळांमध्ये गोरी मुले इतरवर्णीय मुलांना ''ट्रम्प जिंकल्यावर तुम्हाला इथून हलायला लागेल'' असे निवडणुकीआधीच धमकावू लागली, मिश्रवंशीय मुलांचा प्रश्न आई-बापांना भेडसावू लागला, मुस्लीम तर गांगरून गेलेच पण आजवर थोडेफार समाजात मिसळणारे कृष्णवर्णीयही अस्वस्थ झाले. गोऱ्या वर्चस्ववादी संघटना, बंदुका बाळगण्याचा पुरस्कार करणारी प्रबळ संघटना, अशांनी ट्रम्प यांना उघड पाठिंबा दिला, पैसेही पुरवले.

हे सगळे मुद्दे मीडियाने लावून धरले. तो या निवडणुकीतील महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग आहे. एकूण चित्र असे निर्माण करण्यात आले की क्लिंटनबाई काही सर्वगुणसंपन्न नाहीत पण ट्रम्प जगाला आणि अमेरिकेलाही धोकादायक आहे. ट्रम्प यांनी नेमके यावर बोट ठेवले. निवडणुकीच्या दरम्यान प्रसारमाध्यमांविरुद्ध उघड भूमिका घेणे एरवी आत्मघातकी ठरले असते. पण ट्रम्प यांनी मीडियाला कचाट्यात पकडले. मीडिया प्रस्थापिताचा भाग आणि तितकाच भ्रष्ट आहे हे लोकांना पटवले. ट्रम्प यांना मोफत प्रसिद्धी मिळत राहिली कारण त्याच्याकडे दुर्लक्ष करणे मीडियाला परवडले नसते. क्लिंटनला प्रसिद्धी विकत घ्यायला लागली आणि तरी तेवढी मिळालीही नाही. माणूस पसंत असो वा नसो, मीडियाचे अनैतिक सामर्थ्य आणि बोगसपणा पुढ्यात आणणे हे ट्रम्प यांचे लोकशाहीला मोठे योगदान आहे.

तसेच सुरुवातीपासूनच ट्रम्प स्वत:च्या पैशाने निवडणुकीत उतरले, रिपब्लिकन पक्षाच्या निधीवर नाही. किंबहुना, रिपब्लिकन पक्षाचा पसंतीचा उमेदवार जेब बुश होता. हा पहिल्या बुशचा मुलगा आणि दुसऱ्या बुशचा भाऊ. ते दोघेही अमेरिकेचे माजी अध्यक्ष. ती घराणेशाही विरुद्ध क्लिंटन घराणेशाही हे पक्षांतर्गत निवडणुका सुरु होण्याआधीचे चित्र होते व या दोघांतील एकजण नवा अध्यक्ष होईल हा 'आधी माहिती असलेला' निकाल होता. तसे झाले असते तर सद्यस्थितीच थोड्याफार फरकाने चालू राहिली असती. पण अंतर्गत निवडणुकात बुश निष्प्रभ झाल्यावर, पक्षाने मार्को रुबिओ हा दुसरा उमेदवार आपला माणूस ठरवला आणि पैसा त्याच्यावर ओतला. एक वेळ तरी अशी आली की पक्षाने उमेदवारी न दिल्यास मी अपक्ष म्हणून लढेन असे ट्रम्प यांनी जाहीर केले. त्यांचे आणि पक्षाच्या नेतृत्वाचे कधीच जमले नाही, पक्षाच्या मान्यवरांनी तर हा उमेदवार आमचा नाही असे अनेकदा जाहीर केले. पण लोकांचा ट्रम्प यांना वाढता पाठिंबा पाहून त्यांचा नाइलाज झाला. ट्रम्प यांचा मतदार प्रामुख्याने अल्प-शिक्षित, बेरोजगार गोरे. त्यांना ट्रम्प यांनी नोकऱ्या द्यायचे आश्वासन वारंवार दिले. तो मतदार दुरावणे पक्षाला परवडणार नव्हते. ट्रम्प स्वत: अब्जाधीश, स्वत:च्या विमानाने देशभर स्वखर्चाने फिरतो हे लोकांना दिसत होते. पण असा माणूस आपली दु:खे समजावून घेतो मग त्याच्या अचाट विधानांकडे दुर्लक्ष करायला लोकांना हरकत वाटली नाही. याविरुद्ध क्लिंटन दांपत्याचा स्वत:चा न्यास, त्याला सौदी अरेबिया, कटार सारख्या हुकूमशाही राजवटी अब्जावधी डॉलर्स देतात (या न्यासाला मदत मिळावी म्हणून बाईंनी परराष्ट्रमंत्रीपदाचा दुरुपयोग केला असेही आरोप झाले), बाई स्वत: लाखो डॉलर्सचा मोबदला वाजवून घेऊन कित्येक संस्थांमध्ये भाषणे ठोकतात हेही लोकांना दिसत होते. क्लिंटन लोकांपासून कायमच काहीतरी लपवत आहेत ही समजूत दृढ होत गेली. पहिल्या ओबामा राजवटीमध्ये परराष्ट्रमंत्री असताना त्यांनी खाजगी ई-मेलवरून सरकारी संदेश पाठवले हे प्रकरण निवडणुकीआधीच्या आठवड्यापर्यंत रेंगाळत राहिले. ते त्यांच्या विश्वासार्हतेला निर्णायक धक्का देणारे ठरले.

म्हणजे प्रस्थापिताचा भाग असणाऱ्या क्लिंटन विरुद्ध प्रस्थापिताचे फायदे कायदेशीर/बेकायदेशीररीत्या मिळवत अति-श्रीमंत झालेला ट्रम्प असा हा निवाडा होता. ट्रम्प यांनी लोकांची नाडी ओळखली. ती मीडियाला ओळखता आली नाही, निवडणुकीचे अंदाज वर्तवणाऱ्या प्रतिष्ठित कंपन्यांना ओळखता आली नाही - त्या तर आदल्या दिवसापर्यंत क्लिंटन आघाडीवर असल्याचा निर्वाळा देत होत्या - आणि क्लिंटनना तर नाहीच नाही. ट्रम्प यांनी निवडणुकीवर क्लिंटनच्या निम्म्यापेक्षा कमी खर्च केला. प्रचारासाठी महागडे तज्ज्ञ नेमले आहीत, भिस्त प्रामुख्याने मुलगी व जावई यांच्यावर.

ट्रम्प यांचे वडीलही धनाढ्य होते, त्यांच्याकडून दीड कोटी

*(पान ३१ वर)*

***जगभर,*** *(पान ११ वरून)*

डॉलर्सचे कर्ज घेऊन ट्रम्प यांनी स्वत:चे गृहबांधणी, गोल्फची मैदाने, पंचतारांकित हॉटेल्स असे साम्राज्य उभे केले. दरम्यान या गृहस्थाने कर चुकवले, कृष्णवर्णीयांना आपल्या गृहसंकुलात प्रवेश नाकारला, त्यावर तक्रारी झाल्यावर प्रकरणे 'मिटवली', ज्या मेक्सिकन कामगारांवर त्याने प्रचारादरम्यान ते अमेरिकन नोकऱ्या पळवतात अशी आगपाखड केली त्यांनाच स्वत:च्या व्यवसायात त्याने बेकायदेशीर नोकऱ्या दिल्या होत्या, स्त्रियांशी त्याने अनेकदा गैरवर्तन केले होते (अशा सतरा स्त्रिया एकीमागून एक पुढे आल्या - त्या सगळ्या तर खोटे बोलत नसतील), त्याचे आंतरराष्ट्रीय अज्ञान, पर्यावरणाचा नाश हे चीनचे थोतांड आहे असे मत - या सगळ्याकडे लोकांनी काणाडोळा केला. त्यावरून व्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास काय थरापर्यंत उडालेला आहे हे स्पष्ट झाले. रुढ राजकारणी लोकहित पहात नाहीत. ते फक्त जागतिक आर्थिक संस्थांचे, बड्या बँकांचे धोरण अमलात आणतात त्यामुळे जो आजवर राजकारणात नव्हता तो उमेदवार लोकांना मान्य झाला.

वस्तुत: ट्रम्प जे मुद्दे शिवराळ भाषेत मांडत असत, तेच मुद्दे अधिक अभ्यासूपणे, अधिक सयुक्तिकरीत्या क्लिंटनचे पक्षांतर्गत विरोधक बर्नी सँडर्स मांडत होते. अमेरिकन अर्थव्यवस्था, बेरोजगारी, जागतिकीकरणाचे अनिष्टपरिणाम, वगैरे. त्यांनी बाईंच्या तिजोरीच्या काही अंशमात्र खर्च करून लोकांचा पाठिंबाही मोठ्या प्रमाणावर मिळवला होता आणि बाईंना चांगली झुंज दिली होती. पण प्रचंड पैशाच्या बळावर बाईंनी उमेदवारी मिळवली. सँडर्स यांचे मतदार तरुण, शिक्षित आणि बाहेरच्या जगाची जाणीव असणारे होते. ब्रिटनने युरोपिअन युनिअनमधून बाहेर पडू नये - ब्रेक्झिट नको - अशा मतदारांसारखेच. त्यांची बाईंच्या उमेदवारीने मोठीच निराशा झाली व काही जणांनी अध्यक्षीय निवडणुकीत मतदानच केले नाही. तोच प्रकार 'आपल्या खिशातला मतदार' म्हणून क्लिंटन यांनी ज्यांना गृहीत धरले त्या कृष्णवर्णीय व द.अमेरिकन वंशाच्या लोकांबाबत.

अमेरिकेचे जागतिक सामर्थ्य पहाता या निकालाने जगभर समीकरणे बदलत आहेत. रशियाचा सर्वेसर्वा पुतीन, सिरीयाचा क्रूरकर्मा असद यांनी या निवडीचे त्वरित खास स्वागत केले. अशा नेतृत्वाच्या पुरस्काराने लोकशाही, मानवी मूल्ये, मुक्त बाजार यांच्या स्वयंघोषित ठेकेदारांच्या छातीत धडकी भरली आहे. कालपत्रकानुसार ट्रम्प पुढच्या वर्षी शपथ-ग्रहण करणार. आज ते निर्वाचित अध्यक्ष आहेत. पण या भयाचे प्रत्यंतर म्हणून जपानचे पंतप्रधान तातडीने ट्रम्प यांना भेटायला रवाना झाले आणि त्यांनी ट्रम्प यांच्याशी जपान व्यवहार करू शकेल अशी ग्वाही १७ नोव्हेंबरला दिली. ब्रिटनच्या पंतप्रधान तेरेसा मे यासुद्धा ट्रम्प यांना लवकरात लवकर भेटायला उत्सुक आहेत.

या विजयाचे तात्त्विक खुलासे लगेच होऊ लागले. (याच तज्ज्ञांनी निकाल उलटा लागला असता तर उलटे खुलासे तितक्याच तत्परतेने दिले असते!) पहिला म्हणजे हा पुरुष-प्रधान संस्कृतीचा आणि स्त्री-द्वेष्टेपणाचा विजय आहे. दुसरा खुलासा - हा गौरवर्णीय वर्चस्ववादाचा विजय आहे. तिसरा - हा राष्ट्रवादाचा विजय आणि जागतिकीकरणाचा पराजय आहे, इत्यादी.

अमेरिकेत काही शहरांत ट्रम्प यांच्या निवडणुकीचे तीव्र पडसाद उठत आहेत. 'Not My President' अशा घोषणा देत लोक रस्त्यावर निषेध व्यक्त करत आहेत. हे जमाव स्वयंस्फूर्त दिसतात. म्हणजे क्लिंटनने चिथावणी दिलेले वाटत नाहीत. ट्रम्प यांनी निवडणूक जिंकताच ३० लाख बेकायदेशीर परदेशीयांना तातडीने अमेरिकेतून हाकलण्यात येईल असे जाहीर केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून काही शहरांनी आम्ही या लोकांचे स्वागत करु असे जाहीर केले.

एकूण चित्र पहाता ट्रम्प यांची निवडणुकीतील मुक्ताफळे शब्दश: खरे धोरण मानण्याकडे आज जगाचा कल दिसतो. त्यामुळे घबराट. 'लांडगा आला रे आला' ही हाकाटी पिटणारे लोक जगभर आढळतात. त्यांचा मुळात लोक-शक्तीवर विश्वास नसतो. (उदा. मोदी आल्यापासून आपल्याकडेही हा बोभाटा चालू आहे). पण या गृहस्थांची कोलांट्या उड्या मारण्याची हातोटी लक्षात घ्यायला हवी. आज एक म्हणायचे, उद्या मी ते म्हणलोच नाही असे तितक्याच निर्लज्जपणे आणि सरळ चेहऱ्याने म्हणायचे; तेही व्हिडिओवर पुरावे असताना! हे गेले वर्षभर रोज दिसत आहे.

तरीही, प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते - राजवाड्याच्या कळसावर बसला म्हणून कावळा काही गरुड होत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे, अगदी अमेरिकेचा अध्यक्ष असला, तरी त्याच्या बळावर (इथे घसरडेपणावर) मर्यादा असतात. त्यांचे देशांतर्गत checks and balances असतात. बाहेरुनही अनेक प्रभाव व प्रवाह सतत चालू असतात. ते या वरवर दिसणाऱ्या व्यक्तिकेंद्रित सत्तेवर नियंत्रण राहते.

प्रस्थापित राजकारण, मीडिया, समाज-तज्ज्ञ यांचा पोकळपणा लोकांनी उघडकीला आणला ही या निकालाची मोठी फलश्रुती. वाढलेला सामाजिक विद्वेष, उभी दुभंगलेली अमेरिका आणि नव्या राजवटीचे परराष्ट्रीय धोरण यांचे परिणाम कालानुसार स्पष्ट होतील.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*